# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

निष्काम जन सेवार्थ समर्पिता

**गुरुवार दिनांक २८.०१.२०१६ (का.प क्र.१२ दिनांक २८.१२.२०१५ ची तहकुब सभा) रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.**

गुरुवार दिनांक २८.०१.२०१६ (कार्यक्रम पत्रिका क्रमांक-१२ दिनांक २८.१२.२०१५ ची तहकुब सभा) रोजी मा.महापौर श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दुपारी ०३.१५ वा. वंदेमातरम या गिताने सुरू झाली. सभेला मा.आयुक्त श्री.रमेश पवार, नगरसचिव, श्री.दिलीप सुर्यवंशी व संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सदस्य उपस्थित होते.

१. स.स. श्री. प्रमोद प्रल्हाद राठोड
२. स.स. श्री.थोरात दिलीप गंगाधर
३. स.स. श्री.जंजाळ राजेंद्र हिम्मतराव
४. स.स. श्री.बमणे पुनमचंद सोनाजी
५. स.स. श्री.जाधव बन्सी ग्यानू
६. स.स. श्री.वाघमारे रुपचंद लक्ष्मण
७. स.स. श्रीमती ज्योती जयेश अभंग
८. स.स. श्री.राजगौरव हरिदास वानखेडे
९. स.स. सौ.रोजतकर पुष्पा उत्तमराव
१०. स.स. श्री.विजय साईनाथ औताडे
११. स.स. श्री.सुरे सीताराम इसराम
१२. स.स. सौ.स्वाती किशोर नागरे
१३. स.स. श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
१४. स.स. श्री.खान अय्युब म.हुसेन खान
१५. स.स. श्री.जाधव ज्ञानोबा पांडूरंग
१६. स.स. श्रीमती निकाळजे आशा विजय
१७. स.स. श्री.शेजवळ सुभाष सयाजी
१८. स.स. श्री.रावसाहेब राधाकिसन आमले
१९. स.स. श्रीमती लोखंडे मनिषा विनोद
२०. स.स. श्री.अफसर खॉन यासीन खॉ
२१. स.स. श्री.कादरी जमीर अहेमद रहीम अहेमद
२२. स.स. श्री.सय्यद मतीन रशीद
२३. स.स. श्रीमती तसनीम बेगम अ.रऊफ
२४. स.स. श्रीमती खान सायरा बानो अजमल
२५. स.स. श्री.सिद्दीकी नासेर तकीउद्दीन
२६. स.स. श्रीमती शेख नरगीस सलिम
२७. स.स. श्रीमती खरात सिमा गणपत

२८. स.स. सौ.शोभा नारायणराव वळसे
२९. स.स. श्री.चित्ते नितीन रमन
३०. स.स. सौ.ज्योती सुभाष पिंजरकर
३१. स.स. श्रीमती शबनम बेगम कलीम कुरेशी
३२. स.स. श्रीमती संगिता सुभाष वाघुले
३३. स.स. श्री.मलके गोकुलसिंग संपतसिंग
३४. स.स. श्रीमती सुरेखा बाळासाहेब सानप
३५. स.स. श्रीमती वैशाली कारभारी जाधव
३६. स.स. श्री.शिंदे राजु रामराव
३७. स.स. श्रीमती खरात सुरेखा गौतम
३८. स.स. श्री.मकरंद माधवराव कुलकर्णी
३९. स.स. श्रीमती नसीम बी सांडु खॉ
४०. स.स. श्री.अजीम अहेमद रफीक
४१. स.स. श्रीमती साजेदा फारुखी सईद फारुखी
४२. स.स. श्रीमती खतीजा कुरैशी छोटू कुरैशी
४३. स.स. कु.यशश्री लक्ष्मीनारायन बाखरीया
४४. स.स. श्री.तनवाणी राजु लेखराज
४५. स.स. श्री.ढगे गंगाधर नामदेव
४६. स.स. श्रीमती खान नसरीन बेगम समद यारखॉ
४७. स.स. श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे
४८. स.स. श्री.एडके विकास प्रकाश
४९. स.स. श्रीमती चावरीया बबीता विजय
५०. स.स. श्री.भादवे रामेश्वर बाबुराव
५१. स.स. श्री.बल्लाळ मनोज आसाराम
५२. स.स. श्रीमती मलेका बेगम हबीब कुरैशी
५३. स.स. श्रीमती शेख समिना शेख इलियास
५४. स.स. श्री.जायभाय रमेश भानुदास
५५. स.स. श्रीमती गादगे शितल विरभद्र
५६. स.स. श्री.दांडगे शिवाजी भाऊसाहेब
५७. स.स. श्रीमती देसरडा राखी प्रशांत
५८. स.स. श्रीमती भालेराव आशा नरेश
५९. स.स. श्रीमती जोहरा बी नासेर खान
६०. स.स. श्री.खैरे ऋषिकेश चंद्रकांत
६१. स.स. श्रीमती रेशमा अशफाक कुरेशी
६२. स.स. श्री.बारवाल गजानन रामकिसन
६३. स.स. श्रीमती वाडकर शिल्पाराणी सागर
६४. स.स. श्रीमती बनकर विजया संजय
६५. स.स. श्री.साळवी नितीन दशरथ
६६. स.स. श्रीमती विधाते अंकिता अनिल

६७. स.स. श्रीमती कुलकर्णी जयश्री सुरेंद्र
६८. स.स. श्री.मनगटे गजानन भानुदास
६९. स.स. श्रीमती देशमुख माधुरी मिलींद
७०. स.स. श्रीमती सत्यभामा दामु अण्णा शिंदे
७१. स.स. श्री.जगताप भाऊसाहेब उत्तमराव
७२. स.स. श्रीमती नरोटे कमल रामचंद्र
७३. स.स. श्री.जगताप कमलाकर शामराव
७४. स.स. श्रीमती चव्हाण सुनिता रामराव
७५. स.स. श्री. भगवान (बापु) देविदास घडमोडे
७६. स.स. श्री.गांगवे मनोज बन्सीलाल
७७. स.स. श्री.सोहेल शकील शेख
७८. स.स. श्रीमती ज्योती सुनिल नाडे
७९. स.स. श्रीमती साळवे अनिता मोहन
८०. स.स. श्रीमती मुंढे मनिषा बाळासाहेब
८१. स.स. श्रीमती मिना रामदास गायके
८२. स.स. श्री.पवार आत्माराम माणिकराव
८३. स.स. श्रीमती मोरे ज्योती राजाराम
८४. स.स. श्रीमती विमल गोविंद केंद्रे
८५. स.स. श्रीमती चक्रनारायण सीमा काहानुलाल
८६. स.स. श्रीमती अर्चना शैलेंद्र निळकंठ
८७. स.स. श्रीमती सुमित्रा गिरीजाराम हाळनोर
८८. स.स. श्रीमती निकाळजे लता मगन
८९. स.स. श्री.सोनवणे राहुल पंढरीनाथ
९०. स.स. श्री.विकास रतनलाल जैन
९१. स.स. श्री.सिद्धांत संजय शिरसाट
९२. स.स. श्री.अब्दुल मं.नाविद अब्दुल रशीद
९३. स.स. श्रीमती विमल जनार्धन कांबळे
९४. स.स. श्री.घोडेले नंदकुमार राधाकिसन
९५. स.स. श्रीमती मुल्ला सलीमा बेगम खाजोददीन
९६. स.स. श्रीमती शोभा गरुलिंगअप्पा बुरांडे
९७. स.स. श्रीमती स्मिता दिगंबर घोगरे
९८. स.स. श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण

**नामनिर्देशित पालिका सदस्यांची नावे**

१. श्री.शेख अब्दुल ताहेर अब्दुल करीम
२. श्री.घोडके कचरु छगनराव
३. श्रीमती आऊलवार सुनिता तुकाराम
४. श्री.कांबळे चेतन जनार्धन
५. श्री.चंदु किशनचंद तनवाणी

श्री.गजानन बारवाल :प्रसिध्द उद्योगपती व व्यापारी महासंघाचे माजी अध्यक्ष श्री.वसंतभाई हौजवाला याचे दु:खद निधन झाले श्रध्दांजली अर्पण करावी.

श्री.राजु शिंदे :स्व.राम मगर यांनी ब्रेन डेड, अवयव दान, लिव्हर, किडनी, हृदय दान केले. हे देण्यासाठी त्यांचे आईने धाडसी निर्णय घेतला ही क्रांतीकारक घटना घडली त्यांना श्रध्दांजली अर्पण करावी. तसेच त्यांच्या आईचे अभिंनदन करावे.

श्री.बापू घडमोडे :स्व.हौजवाला यांचा सार्वजनिक जीवनात सहभाग होता. शहरासाठी अनेक उपक्रम राबविले. तसेच राम मगर यांनी अवयव दान केले. एक आदर्श निर्माण केला. हे ज्वलंत उदाहरण आहे. श्रध्दांजली देण्यात यावी, स्व.राम मगर यांच्या आईने मुलाचे अवयव दान देण्याचा धाडसी निर्णय घेतला. त्यांचे अभिनंदन करावेच परंतु सन्मान म्हणून पत्र देण्यात यावे. ज्या हॉस्पीटलमध्ये या शस्त्रक्रिया केल्या तेथील डॉक्टरांचे सुध्दा डॉ.टाकळकर, धुत हॉस्पीटल इत्यादींचे अभिनंदन करावे. श्रध्दाजंली अर्पण करावी.

श्री राजेंद्र जंजाळ :स.सदस्यांनी ज्या सुचना केल्या त्यास अनुमोदन आहे. प्राणी संग्रहालयातील गुड्डू नावाच्या वाघाचे निधन झालेले आहे. शहरातील अनेक नागरीकांचे गुड्डू या वाघाने मनोरंजन केलेले आहे. गुड्डू नावाच्या वाघालाही श्रध्दाजंली अर्पण करावी.

श्री.भाऊसाहेब जगताप :जे धाडस राम मगर यांच्या आईने दाखविले त्याचे कौतुक आहे. स्व.राम मगर यांना श्रध्दाजंली अर्पण करावी.

श्री.ए.टी.शेख :रामच्या आईचे अभिनंदन करण्याचा ठराव पास करण्यात यावा. एक कार्यक्रम घेऊन रामच्या आईचा सत्कार करण्यात यावा.

मा.महापौर :ठिक आहे सर्वांनी श्रध्दाजंली अर्पण करण्यासाठी उभे रहावे.

(या वेळी स्व.वसंतभाई हौजवाला, स्व.राम मगर यांना सभागृहाच्या वतीने दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली.)

मा.महापौर :शहर स्वच्छ बनविण्यासाठी श्री.झनझन, आयुक्त यांनी नियोजन केले. कॅरीबॅग, कचरा मुक्ती करण्याचा विषय असेल, आता १२ वार्ड ऐवजी २४ वार्डात कचरा मुक्त करण्याचे नियोजन होत आहे. चागली बाब आहे. त्यांचे व या शहराच्या स्वच्छतेसाठी जानकीदेवी बजाज ग्राम विकास संस्थेच्या मार्फत औरंगाबाद मनपास कचरा निर्मुलनासाठी रूपये १,६०,००,०००/- देणगी दिली त्यांचेही अभिनंदन. शहरातील चौक ज्यांनी  सुशोभीकरणासाठी दत्तक घेतले त्यांचेही महानगरपालिकेच्या वतीने अभिनंदन करण्यात येते.

शहर अभियंता :सातारा-देवळाई, पाणी पुरवठासाठी कलेक्टर ऑफिस कडे १५ लक्ष भरायचे आहे आजच आपण पैसे भरणार आहोत.

मा.महापौर :कलेक्टर ऑफिस तर्फे पाणी पुरवठा केला तर आपणाला खर्च कमी येईल.

श्री.राजु शिंदे :शहराच्याही पाणी पुरवठा कलेक्टर ऑफिस मार्फत केला तर योग्य होईल का?

मा.महापौर :त्यांचेतर्फे व महापालिकेने पुरवठा करण्यामध्ये किती फरक येतो.

शहर अभियंता :त्यांचे ट्रिपला १८० रू महापालिकेने केले तर २५० पर्यत खर्च येतो.तेथे पाणीपुरवठा करण्यासाठी निवदा प्रक्रिया सुरू आहे. कलेक्टर ऑफीस पाणीपुरवठा करण्यास तयार आहे पेमेंन्ट फक्त वेळेवर दयावे लागेल.१३ व्या वित्त आयोगामार्फत हायड्रोलीक मॉडल प्रमाणे कार्यवाही करता येईल.

श्री.गजानन बारवाल :जो करारनामा केलेला आहे त्याप्रमाणे पाणी दयावे.

मा.महापौर :मा.आयुक्तांनी कंपनीच्या लोकांना बोलवावे. चर्चा करावी. योग्य ते नियोजन करावे. पाणीप्रश्न सोडवावा.

शहर अभियंता :शहर अभियंता म्हणून काही अधिकारात माझ्याकडे काम दिले आहे. गरजेनुसार प्रत्येक सदस्याच्या वार्डात विकास कामे फेब्रुवारीपासून सूरू होतील.नाट्यगृह संत तुकाराम व संत एकनाथ खुर्च्याची वाईट परीस्थिती आहे श्री.अनिल भंडारी, उदयोजक स्व खर्चाने या दोन्ही नाट्यगृहातील सभागृहातील खुर्च्या बदलुन देणार आहेत. शहरातील ७-८ कामे करण्याचे मंजूर केले सर्व चौकातील कामे करण्यास प्राधान्य मिळालेले आहे. फेब्रुवारीमध्ये डिस्ट्रीब्युशनचे पाईप लावण्यात येणार आहे. सिव्हरेज ट्रिटमेंट प्लॅन्ट चौकोनी आणि गोल ढापे देणे बाबत मान्यता केलेली आहे. नारेगाव येथील व कचरा खिल्लारी यांनी CSR मध्ये करण्याचे सांगण्यात आले आहे, बजाज आणि सीएसआय एमओयु झालेले आहे. बजाज कंपणी मध्ये एक कोटी सहा लाख रूपये योग्य प्रकारे Implementation करण्यासाठी. २/३ कंपन्या कन्सल्टन्सी कंपनी आहे. स्वच्छतेसाठी १,६०,००,०००/- देणार आहे. मिटमिट्याला सफारी पार्क शिफ्ट करायच्या आहे. ५० कोटीच्या किंमतीचे प्रपोझल करुन देणार आहे. मा. पालकमंत्री यांनी आश्वासन दिले होते की २०० एकर जमीन मिळणार आहे. पत्र व्यवहार सुरु आहे. जागा मिळणे बाबत प्रक्रीया सुरु आहे. अनाधिकृत नळ कनेक्शन बाबत अभय योजने बाबत त्यावरची मुदतवाढ दिल्यास महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ होईल.

मा.महापौर :ठिक आहे. आम्ही सर्व पदाधिकारी येऊ.

शहर अभियंता :तसेच नॅशनल हायवे वर ५० कोटीचे प्रपोजल करून देणार आहे. मा.श्री.गडकरी साहेबांनी सांगितले या शहरासाठी मोठा निधी मिळेल अनाधिकृत नळ रेग्युलाईज करण्यासाठी एक वर्षाची मुदतवाढ दिली आहे त्यानुसार कार्यवाही होईल.

श्री.राजु शिंदे :जे जे आताच सांगितले ते सर्व कामे सामाजिक बांधीलकी म्हणून जे उद्योजक असतील नामांकित व्यक्ती जे दानशूर असतील त्यांनी दिलेल्या रक्कमेमधून करावे.

मा.महापौर :एक चांगले काम शहरासाठी होत आहे. शहरातील नामांकित व्यक्ती, उद्योजक यांचा हातभार लागतो यांचे अभिनंदन करण्यात येते. निधी देण्यासाठी मालमत्ता कराच्या माध्यमातून चांगले काम झाल्यास आपल्याला कुणाकडे जाण्याची गरज नाही. मालमत्ता करासाठी जे जे उपाय पाहिजे ते ते करायला पाहिजे. मा.आयुक्त यांनीही मालमत्ता करामध्ये लक्ष दिले पाहिजे.

**<u>विषय क्रमांक २६९:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मा.सर्वसाधारण सभा ठराव कमांक २३३/३ दिनांक २०.०१.२००४ व १९४/३ दिनांक १८.०२.२००६ नुसार सिडको अधिसुचित क्षेत्रातून वगळून महानगरपालिका हद्दीत समाविष्ट क्षेत्रासाठी व महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीसाठी शासनाने मंजुर केलेली विकास योजना सुधारित करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २३(१) सह कलम ३८ अन्वये इरादा जाहिर केलेला होता. या क्षेत्रासाठी प्रारूप विकास योजना तयार करणे संदर्भात औरंगाबाद महानगरपालिकेच्या विनंती नुसार शासनाने दिनांक १३.०१.२०११ च्या

निर्णयानुसार उपसंचालक नगर रचना, विकास योजना विशेष घटक, महानगरपालिका औरंगाबाद या कार्यालयाची स्थापना केलेली असून हे कार्यालय दिनांक २०.०१.२०११ पासून कार्यरत आहे.

औरंगाबाद महानगरपालिकेने वरील नमुद पारीत केलेले ठराव हे महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २३ (१) सह कलम ३८ च्या मर्यादेतील असल्याने तसेच औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रात सिडको अधिसुचित क्षेत्रातून वगळण्यात आलेले क्षेत्र नव्याने अंतर्भुत झाल्याने उक्त अधिनियमातील उक्त कलमाबरोबर कलम-३४ चा ही उल्लेख आवश्यक असल्याने या कार्यालयाच्या सुचनेनुसार औरंगाबाद महानगरपालिकेने दिनांक १८.०५.२०११ चे ठराव क्र.३१७ अन्वये नव्याने याच विषयाबाबतचा ठराव पारीत केलेला आहे. त्या अनुषंगाने हा इरादा दिनांक ०७.०२.२०१३ च्या महाराष्ट्र शासन राजपत्रामध्ये प्रसिध्द झालेला आहे. तसेच उक्त अधिनियमाचे कलम-२४ अन्वये उपसंचालक नगर रचना, विकास योजना विशेष घटक, महानगरपालिका औरंगाबाद यांची औरंगाबाद महानगरपालिकेने आदेश क्रमांक २४३ दि.०५.०२.२०१३ अन्वये नगर रचना अधिकारी म्हणुन नेमणुक केलेली आहे.

तद्नंतर विद्यमान जमीन वापर नकाशा तयार करून तो दिनांक ०१.०८.२०१४ रोजी उपसंचालक नगर रचना, विकास योजना विशेष घटक, महानगरपालिका औरंगाबाद यांनी औरंगाबाद महानगरपालिकेकडे हस्तांतरीत केला आहे व तद्नंतर प्रारुप विकास योजना नकाशा व अहवाल तयार करून तो उपसंचालक नगर रचना, विकास योजना विशेष घटक, महानगरपालिका औरंगाबाद यांनी गोपनिय पत्र क्रमांक-११ दिनांक ३१.१०.२०१५ रोजीच्या पत्रान्वये मा. आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका यांच्याकडे सुपूर्द केला आहे. तरी उक्त प्रारुप सुधारित विकास योजना उक्त अधिनियमाचे कलम २६(१) अन्वये प्रसिध्द करण्याची कार्यवाही मा.सर्वसाधारण सभेच्या ठरावा द्वारे करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियमाच्या तरतुदीनुसार उक्त प्रारूप विकास योजना कलम २६(१) अन्वये प्रसिध्द करणेची मुदत, इरादा महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द झालेल्या तारखेपासून म्हणजेच दिनांक ०७.०२.२०१३ पासून दोन वर्षापर्यंत म्हणजे दिनांक ०६.०२.२०१५ पर्यंत होती. उपसंचालक, नगर रचना हे पद रिक्त असून लातूर येथील उपसंचालक, नगर रचना प्रादेशिक योजना लातूर यांचेकडे अतिरीक्त कार्यभार आहे. तसेच या कार्यालयातील नगर रचनाकार यांचे पदही प्रदिर्घ काळापासून रिक्त आहे. परंतु उक्त विकास योजनेचे प्रारूप नकाशा आणि अहवाल तयार करण्याचे काम पुर्ण करणेस लागलेल्या कालावधी विचारात घेता कलम २६(१) अन्वये प्रारुप सुधारित विकास योजना प्रसिध्द करणेसाठी ही मुदत एक वर्षासाठी म्हणजेच दिनांक ०७.०२.२०१५ ते दिनांक ०६.०२.२०१६ पर्यंत वाढवून घेणे आवश्यक आहे.

करीता वरील प्रमाणे प्रारुप सुधारित विकास योजना कलम २६(१) अन्वये प्रसिध्द करणे व मुदतवाढीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव तथा आदेशास्तव सादर.

श्री.बारवाल गजानन :मुदतवाढ एक वर्षाची मागितली आहे ती एक महिण्याने संपणार आहे केंव्हा पासून कार्यकाळ धरणार आहे.

नगररचना अधिकारी(श्री.पाटील):मुदतवाढ एक वर्षासाठी म्हणजेच दिनांक ०७.०२.२०१५ ते दिनांक ०६.०२.२०१६ पर्यंत वाढवून घेणे आवश्यक आहे.

मा.महापौर :सभा तहकुब केली होती सदस्यांना अभ्यासासाठी विकास आराखडा ठेवला होता सदस्यांच्या भावना लक्षात घेता वॉर्ड वाईस चर्चा करु या,

श्री.गजानन बारवाल :आपणाकडे भरपूर निवेदने आले असतील त्याबाबत थोडक्यात माहिती घ्यावी. त्यामुळे नागरीकांना दिलासा मिळेल.व सदस्यांचेही मत जाणून घ्यावे.

मा.महापौर :थोडक्यात आपले आरक्षणा बाबत म्हणणे मांडावे.

श्रीमती सविता सुरे :वॉर्डामध्ये जे आरक्षण पडलेले आहे. ते अन्याय करणारे आहे. १६१, १६२, १६३, १४९,१६५,१८१,१४७,१७३,१७४,१८३,१८२, या ठिकाणी आरक्षण पडलेले आहेत. या ठिकाणी नागरीक २० ते २५ वर्षापासून राहत आहेत. जे आरक्षण पडलेले आहे ते रद्द करण्यात यावे.

श्री.रूपचंद वाघमारे :एकता कॉलनी, राधास्वामी या ठिकाणी १०० टक्के घरे पडलेले आहेत. वॉर्ड क्र.३, गट नं. २११ प्ले-ग्राऊंड आरक्षण टाकण्यात आले आहे. गट क्र-२०७, शाळेचे आरक्षण टाकलेले आहे. गट क्र-२२० येथे भाजी मंडईचे आरक्षण टाकण्यात आले आहे. त्या बाबतीत विचार व्हावा. जे आरक्षण टाकलेले आहे. ते रद्द करण्यात यावे.

मा.महापौर :आपल्या वॉर्डात पाहणी केली. प्रत्यक्ष वॉर्डात फिरून निवेदन प्राप्त झाल्यानंतर नागरीकांची घरे पाडून नागरीकांची घरे तुटणार नाही याची दखल घेतली जाईल.

श्रीमती समिना शेख :जे अक्षेप आरक्षणाच्या बाबतीत सदस्य बोलणार आहे त्यांचा निर्णय बदल करून आजच घेणार आहे का.

मा.महापौर :या संदर्भात अनेक निवेदने आलेली आहे.मागिल बैठकीच्या वेळी अनेक सदस्यांना कुठे आरक्षण आहे नाही तेवढे माहित नव्हते.जे निवेदन आलेले आहे त्यातून काय अपेक्षीत आहे नागरीकांचे काय म्हणणे आहे घरे उठविले जाणार नाही.घरावर आरक्षण असेल याचा विचार करणार आहोत.

श्रीमती समीना शेख :आजच आराखडयात बदल होऊन जनतेसमोर प्रसिध्द होणार आहे का?

नगररचना अधिकारी (श्री.पाटील):कलम २६ प्रमाणे सर्वसाधारण सभेने Present करण्याची मुभा आहे. नकाशा प्रकाशीत करण्यात यावा.

श्रीमती समीना शेख :हा आराखडा नगररचना विभागाने तयार केल्यानंतर विकास योजनेत सुधारणा होईपर्यत फेरफार न करता येणारे नियोजन किंवा सेक्टर दर्शविणारा नकाशा जनतेसमोर प्रसिध्द करण्यात यावा. म्हणजे आता या सभागृहाला बदल करण्याचे अधिकार आहे का? हे जे करतो त्यात २६ (१,२)ची पुर्तता होते का?

नगररचना अधिकारी(श्री.पाटील): जनरल बॉडीला (सर्वसाधारण सभेस) अधिकार आहे. संपुर्ण शहराच्या प्लॅनींग संदर्भात आहे. प्लॅनींग सेक्टरमध्ये बदल करता येणार नाही. सेक्टरची बॉंड्री बदलता येणार नाही.

श्रीमती समीना शेख :यात दिले की नियोजन समितीचा पोट कलम २ अन्वयेचा अहवाल व त्यांच्याकडे आलेल्या सुचना किंवा आक्षेप या गोष्टीचा विचार केल्यानंतर त्यास योग्य वाटेल अशा रीतीने योजनेत फेरबदल किंवा बदल करता येईल.

नगररचना अधिकारी(श्री.पाटील):प्लॅनींग सेक्टरची बॉंड्री बदलता येणार नाही.

श्री.विकास जैन :GB ला बदल करण्याचा अधिकार आहे.

मा.महापौर :जे नियम असेल ते सांगावे.

नगररचना अधिकारी (श्री.पाटील):यात म्हटलेले आहे प्राधिकरण ठरवील अशा अन्य रीतीने प्रसिध्द करील. संपुर्ण शहरासाठी ए बी सी डी इ असे प्लॅनींग सेक्टर केले आहे.

श्री.विकास जैन :या सभागृहाला अधिकार आहे.

श्री.दिलीप थोरात :हा प्रारूप आराखडा सादर करायचा असतांना बरेच प्रमाणात लोकांवर अन्याय झाला आहे. सर्वसाधारण सभेचा अधिकारी आहे सर्वांना न्याय दयावा वस्तीवर आरक्षण टाकले आहे शहरात आपण भेटी दिल्या अनेकांनी कष्ट करून घरे बांधली त्यांचे घरावर आरक्षण टाकण्यात आले आहे. २० वर्षाच्या काळासाठी चांगले प्लॅनींग करावे स्मार्ट सिटी शहरात आपल्या शहराचा समावेश झालेला नाही असे आताच कळले. शहराची वाटचाल होईल अशा रितीने बदल करून योग्य कार्यवाही करावी. गोरगरीबांवर अन्याय होणार नाही दखल घ्यावी. ज्या ठिकाणी उपलब्ध गट आहे त्या ठिकाणी हे आरक्षण टाकण्यात यावे.

श्रीमती समीना शेख :यात बदल केल्यास अनेक लोक मा.न्यायालयात आपल्या निर्णया विरोधात जातील.

श्री.राजू शिंदे :जे आरक्षण टाकले गेले ते काढले तर तेही लोक जातील.मा.न्यायालयात जाण्याचा सर्वांनाच अधिकार आहे.

श्री.राजेंद्र जंजाळ :उच्च न्यायालयात दाद मागता येत नाही. अशी ॲक्टमध्ये तरतुद आहे.

श्री.भगवान घडमोडे :शहराच्या २० वर्षाचा विचार करून शहराचा आराखडा तयार करण्या आला आहे.सादर करतांना अन्याय झाला नागरीक वसाहतीमध्ये आरक्षण पडले आहे.आपण लोकांना दिलासा दयावा.नागरी व गरीब वस्तीमध्ये आरक्षण पडले ते काढावे लागणार आहे तो आपला अधिकारी आहे.जेथे आता आरक्षण पडले ते काढले तर ते लोक कोर्टात जातील अशाने हे नकाशा मंजूरच होणार नाही.

श्री.अफसर खान :आराखडा कुणी तयार केला .१९७५ चा आराखडा केला तेंव्हा कमेटी केली होती १९९१ मध्ये प्लॅन केला तेंव्हाही कमेटी होती २००२ मध्ये दोन स्थायी समितीचे सदस्य नेमले होते. १९९१ चा प्लॅन कोठे आहे कसा आहे त्यात कुठे आरक्षण होते.त्यानंतर यावर चर्चा करण्याची संधी दयावी.

श्री.विकास जैन :१९९५ व १९९२ चा वेगळा आहे शहरी भागाचा १९९५ विषय आहे १९९२ विषय हा १८ खेडीचा होता.

श्री.भगवान घडमोडे :जनता महत्वाची आहे.विकास आराखडयाचा विषय आहे सर्व सामान्यान्या न्याय मिळाला पाहिजे.

श्री.राजेद्र जंजाळ :यावर अभ्यास करण्यासाठी वेळ दिला होता.

श्री.नंदकुमार घोडेले :लोक हवालदिल झालेले आहेत. रस्त्यांवर, घरांवर आरक्षणे पडली आहेत.आज निर्णय घेणे आवश्यक आहे.

मा.महापौर :१०५ निवेदन माझ्याकडे आलेले आहे.वसावतीवर आरक्षण पडले,रस्त्याची आरक्षणे घरावर पडली ज्यांचेकडे १,२ एकर जमीन आहे तेथे पडली या बाबतीत काय करायचे हा निर्णय घ्यायचा आहे.

श्री.सिद्यीकी नासेर :गोरगरीब लोकांच्या वस्तीत आरक्षणे टाकली ते काढावे.

श्री.अफसर खान :हा नकाशा कुणी तयार केला ते आता उत्तर देण्यास सक्षम आहेत का ?

श्री.राजू शिंदे :ज्या चुका झाल्या त्या झाल्या आता.नागरीकांच्या घरावर वस्तीमध्ये आरक्षणे पडली. नागरीक चिंतेत आहे नागरीकांना न्याय मिळेल ते पहावे. चर्चा करून योग्य निर्णय घ्यावा.सर्व लोकप्रतिनिधी यांनी त्या त्या भागात जाऊन पाहणीही केली. जे निवेदन घेतले त्याचाही विचार करावा.

श्री.सय्यद मतीन :वस्तीवर आरक्षण टाकले असेल रस्त्याचे आरक्षण असेल तर ते काढावे.

श्री.नंदकुमार घोडेले :कमी वेळ आहे जनतेच्या हिताचा निर्णय घ्यावा चर्चेला सुरू करावे.
श्री.गंगाधर ढगे :लोकवस्ती वरील आरक्षण रद्य काढावे.
श्री.राजू शिंदे :महापालिकेच्या ॲक्ट नुसार पुर्णपणे अधिकार आहे जे की योग्य निर्णय घ्यावा. कब्रस्तान, स्मशानभुमी यावर ही आरक्षण टाकले गेले आहे.
श्रीमती समीना शेख :आपण निर्णय घेऊ त्यावर जनतेने खापर फोडू नये असा निर्णय घ्यावा.
श्री.नंदकुमार घोडेले :वार्ड निहाय चर्चा करावी.
मा.महापौर :दोन महिण्याचा कालावधी सजेशन ऑब्जेक्शनस्साठी राहणार आहे. कमिटी होईल, कमिटी निर्णय घेईल. त्यानंतर शासनाकडे पाठविले जाईल. शासन त्यास मंजूरी द्यायची की नाही हे ठरविल. जे पर्याय सुचविले आहे त्यानुसार निर्णय घेता येईल. त्यातून कूणी राहू नये.
(या वेळी मा.महापौर यांचे आसनावर मा.उपमहापौर स्थानापन्न होतात.)
श्रीमती ज्योती अभंग : गट नं.२२१, २१६, २१७, २२८ मध्ये नविन आरक्षणे टाकण्यात आलेली आहेत. ती आता कशी काढणार. हरिसिध्दी माता मंदीर ठिकाणी दोन्ही साईडला रस्त्यासाठी आरक्षण टाकण्यात आले आहे ते चुकीचे आहे. आरक्षण हटविण्यात यावे. याबाबत निवेदन दिलेले आहे.
मा.महापौर :जे निवेदन आलेले आहे. अधिकारी यांनी चुकीच्या पध्दतीने आरक्षणे टाकलेली आहेत. जी आरक्षण रद्द करता येणार नाही त्याचा विचार करण्यात येईल. आपल्या निवेदनाचा पुर्ण समावेश करण्यात येणार आहे. कुठल्याही नागरी वस्तीमध्ये आरक्षण टाकण्यात आली आहे. ती काढणे हा आपला प्रमुख उद्देश आहे.
श्री.राजगौरव वानखेडे : नदी नालेच्या बाजुला एलो झोनमध्ये आरक्षण, गट क्रमांक 139,110 मध्ये आरक्षण टाकले. डिनोटीफाईड एरिया आहे. 18 खेडी विकासामध्ये सन 2002 ला डिनोटीफाईड केले आहे. गट क्रमांक 141,110 डिनोटीफाईड आहे. सिडकोमध्ये आरक्षण टाकलेले आहे सिडकोच्या प्लॅननुसार तपासणी केली नाही. गट क्रं139, रोजाबाग मेहेबूबपूरा या डिपी रस्त्यावर 100 टक्के घरे आली आहेत. गट क्रमांक 141 पुने आरक्षण झाली आहेत. गट क्रामंक 23 व 25 हर्सुल राजे संभाजी कॉलनी मधुन रस्ता गेला आहे.
मा.महापौर :डि नोटीफाईड एरियाबाबत माहिती द्यावी.
नगररचना अधिकारी(श्री.पाटील):याबाबत माहिती घेण्यात येईल.
श्री.राजगौरव वानखेडे :घरांवरील आरक्षणे रद्द करू शकतो का? संबधीत अधिकारी यांचेवर कारवाई करण्यात यावी. खांब नदी या आराखडयामध्ये वळविण्यात आलेली आहे.गट नंबर 19 हिमायनगर येथील नदी पात्र कमी करण्यात आलेले आहे. याबाबीची चौकशी करणे अत्यंत आवश्यक आहे.
नगररचना अधिकारी(श्री.पाटील) :रद्द करू शकतो. बदल करण्याचे अधिकार सर्वसाधारण सभेला आहे.
श्री.विजय औताडे :गुगल मॅप विचारात घ्यावा. गट क्र.300 ते 325, मध्ये वसाहत आहे 21,21/11 जमीन तेथे छत्रपती नगर भाग आहे घरे आहे तेथे आरक्षण टाकले 188,189,190 मारोती मंदीर, राजे संभाजी कॉलनी गुंठेवारी भाग तसेच 147,171,181,172,161,162 घरे गट क्र.186 जुनी वस्ती आहे. गट क्र15 भुसंपादन केले नाही. ओपन जागा येलो झोन करण्यात आले. मयुरपार्क

कमिटी आरक्षण टाकलेले आहे. हरसिध्द माता मंदिर येथे आरक्षण टाकलेले आहे. याचा विचार व्हावा. सर्व सामान्य नागरीकांना न्याय द्यावा.

श्री.सिताराम सुरे :आरक्षणबाबतचे आक्षेपाचे निवेदन सादर करण्यात आलेले आहे. गट नं 156मध्ये दाट वस्ती असतांना आरक्षण केलेले आहे. गट क्र.12,13वर एलो झोन करण्यात आले गट क्र 157 भुसंपादन केले होते. तेथे अतिक्रमणे होऊन घरे झाली. 154 मध्ये 12 मी.रस्ता मंजूर आहे. गट क्रमांक 156वर अन्याय केला आहे. गट क्र156,157 हा रद्द करण्यात यावे. पर्याय म्हणुन 15 मीटरचा रस्ता पाहिजे. गट क्र154,155 नागरीकांसाठी आजच्या घडीला कुइलाच रस्ता उपलब्ध नाही. गट क्र 157 पाणीपुरवठयासाठी आरक्षीत केलेला आहे त्या ठिकाणी 300 घरे आहेत. तो रद्द करण्यात यावा. कृषी उत्पन्न समिती येथे पाण्याची टाकी ठेवण्यात यावी. आराग्य केंद्रासाठी जागा उपलब्ध करुन देण्यात यावी. ग्राम दैवत, हरसिध्दी माता मंदीर मोकळया जागेवर 12 मीटर ऐवजी 36 मीटरचा रस्ता करण्यात यावा.

श्री.राजगौरव वानखेडे :एन-13 चा अतिरिक्त भाग नॅशनल कॉलनी, घरावर टाकलेले आरक्षण रद्द करण्यात यावे.

श्रीमती निकाळजे आशा:भिमनगर 32/1, 31/1 मागील 20 वर्षापासून येथे पक्की घरे आहेत त्या ठिकाणी आरक्षण टाकण्यात आलेले आहेत. गट नं 46 येथील डिपी रोड हा 100 ते 150 फुट दाखविण्यात आलेला आहे. तो सरसकट 50 फुट करण्यात यावा.

श्री.रावसाहेब आमले :याबाबतीत मी आक्षेप दाखल केलेला आहे. जयसिंगपुरा गट क्र 1 आणि 5 मिटमिटा 22,29 केंद्र शासनाची जमीन आहे. त्या ठिकाणी रोड होऊ देत नाही. त्या ठिकाणी रस्ते खंडीत झाले. 18 मीटरचा रस्त्यामध्ये घरे आहेत. गट क्रमांक 97,102 मीसबाह कॉलनी येथे गार्डनचे आरक्षण टाकण्यात आलेले आहे. 1000 लोकांचा प्रश्न आहे. ते रद्द करण्यात यावे. गुंठेवारी हा विषय तिथे घेता येईल. जयसींगपुरा 6(2) ए-124, ए-121 गट क्र 9 पडेगांव भाग आहे प्राथमिक शाळेचे आरक्षण टाकलेले आहे. गट नं 9 गार्डनचे आरक्षण केलेले आहे ते कमी करण्यात यावे. त्याच प्रमाणे पडेगांवतील गट नं 129, मिटमिटा या ठिकाणी गावठाण आहे. त्या ठिकाणी झोन नं 1, 66, 66 A-67. 68 मधील आरक्षण काढण्यात यावे. गट क्र 103,104 रस्त्यासाठी आरक्षण टाकले त्यामुळे 300 फुट पुढे सरकत आहे. ए-70 आर येलो झोन आहे. ग्रीन झोन टाकण्यात आला. ते काढण्यात यावे. स्मशनभुमीसाठी जागा आरक्षीत ठेवण्यात यावी.

श्रीमती लोखंडे मनिषा :वार्ड नं. 16 मध्ये गट नं.25,46,54,29,56,57,59,60,61,46, पक्की घरे असतांना रस्त्यासाठी आरक्षण केले गट नं.32,146 व 148 नोंद घेण्यात यावी.

श्री.कादरी जमीर अहेमद रहीम :100 फुट, हिमायतबाग 150 घरे हे आरक्षणामध्ये जात आहे. आरक्षण काढण्यात यावे. हिलाल कॉलनी, दिलरस कॉलनी येथील टाकण्यात आलेले आरक्षण हटविण्यात यावे.

श्री.खान जहाँगीर मुलानी :गट नंबर 222, सारा वैभव या ठिकाणी टाकण्यात आलेले आरक्षण हटविण्यात यावे.

श्रीमती खरात सिमा गणपत: आपले शहर हे स्मार्ट सिटीकडे वाटचाल करीत आहे. या आरक्षणामध्ये मंदिर,मस्जिद, बौध्द विहार यांचेवर आरक्षणे टाकण्यात आलेले आहे. महानगरपालिकेच्या शाळेवर आरक्षण टाकण्यात आलेले आहे.आरक्षणाचे 8 नकाशे आहेत. स्मशानभुमीसाठी जागा आरक्षीत करण्यात आली नाही. अशा अनेक गंभिर चुका शहर विकास आराखडयामध्ये करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे नागरीकांमध्ये भितीचे वातावरण आहे. हा आराखडा रद्द करून नव्याने विकास आराखडा तयार करण्यात यावा. गुंठेवारीमधील घरे व जेथे पक्की घरे, मस्जीद, मंदिी असेल अशा ठिकाणचे आरक्षण काढण्यात यावे.

श्री.नितीन चित्ते :सिडको भाग हा नियोजित वसाहत आहे. या ठिकाणी आरक्षण नाही. पण मी एक सूचना या ठिकाणी मांडतो. शहर विकास आराखडयामध्ये ज्या ठिकाणी High Profile शाळा आहे त्या एकाही शाळेवर आरक्षण नाही. परंतु मनपाच्या शाळेवर आरक्षण टाकण्यात आलेले आहे. शाळेला लागुन मैदानाची आवश्यकता पाहिजे. ते नाही. त्यामुळे मनपाच्या शाळेला लागुन खुले मैदानाचे आरक्षण ठेवण्यात यावे. सोलरसिटी, महिलांसाठी सुलभ शौचालय पाहिजेत.

श्रीमती संगिता वाघुले : आरतीनगर गट नं.130 मध्ये रस्ता 100 फुट करण्यात आलेले आहे. तो रद्द करण्यात यावे. गट नंबर 1 आणि 2 मध्ये आरक्षण टाकलेले आहे. गार्डन, पोलीस स्टेशन,चे आरक्षण नियमित असावे.

श्री.मलके गोकुलसिंग :कचरा डेपोचे आरक्षण रद्द करण्यात रद्द करण्यात यावे.विठ्ठलनगर येथे 30 मीटरचा रस्ता आरक्षण टाकलेले आहेत. त्या ठिकाणी 300 ते 400 घरे आरक्षणामुळे बाधीत होत आहे. जयभवानी चौक येथील रस्ता 30 मीटर ऐवजी 20 मीटर करण्यात यावा. दोन एक जागेवर आरक्षण टाकण्यात यावे. प्रत्येक वार्डामध्ये कचरा डेपोसाठी जागा आरक्षीत ठेवण्यात यावी.

श्रीमती सुरेखा सानप :गट नंबर 30 मधे आरक्षण रद्द करण्यात यावे, बौध्द विहारावर, महानगरपालिकेच्या शाळेवर टाकण्यात आलेले आरक्षण रद्द करण्यात यावे. राजेंद्र नगरण गट नंबर 26,27 वर टाकलेले आरक्षण रद्द करण्यात यावे.

श्रीमती वैशाली जाधव :माझ्या पुर्ण वार्डावरच आरक्षण टाकलेले आहे. त्यामुळे नागरीकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झालेले आहे. त्यामुळे वार्डावर टाकण्यात आलेले आरक्षण रद्द करण्यात यावे.

श्री.शिंदे राजु रामराव :घोषित झोपडपट्टीवर कुठल्याही प्रकारचे आरक्षण टाकता येत नाही. जे टाकण्यात आलेले आहे ते काढण्यात यावे.

नगररचना अधिकारी(श्री.पाटील):घोषित झोपडपट्टीवर आरक्षण ठेवता येत नाही. चुकून झाली असेल तर दुरूस्त करण्यास हरकत नाही. अधिकृत स्लम असेल तर करता येईल. सहसा त्यावर आरक्षण ठेवण्यात येत नाही. चुकून पडले असेल आरक्षण तर दुरूस्त करण्यास हरकत नाही.

श्री.शिंदे राजु रामराव :बनेवाडी येथे अधिकृत झोपडपट्टी आहे. 1982 चे अधिकृत 52 स्लम झोपडपट्टी आहेत. त्यावर कुठलेही आरक्षण टाकु नये, अशी दुरूस्ती यामध्ये करण्यात यावी.

श्री.पाटील (न.र.अ.) :स्पेसिफिक डॉक्युमेंटची माहिती घेवुन निर्णय घेण्यात येईल.चुकीची दुरूस्ती करण्यात येईल.

मा.आयुक्त :घोषित झोपडपट्टीवर आरक्षण टाकु नये. त्यावर दुरूस्ती करणे आवश्यक आहे.

श्री.राजु शिंदे :संबधित अधिकारी यांनी प्रत्यक्षस्थळी जाऊन काम केलेले नाही. चिकलठाणा विमानतळाची जागा संपादित करा म्हणुन सांगण्यात आले. खाजगी जागेवरील जागा प्रस्तावित करावयीच असेल तर आर्थिक बंधपत्र घेणे आवश्यक आहे. एक महिणा झालेला आहे.

श्री.पाटील (न.र.अ.) :प्लॅन सहित प्रस्ताव दिलेला आहे. कार्यालयास बंधपत्र आलेले नाही.

श्री.राजु शिंदे : शासन निर्णयानुसार बंधपत्र आवश्यक आहे.

श्री.पाटील (न.र.अ.) :बंधपत्र सध्या आढळलेले नाही. आपले म्हणने खरे आहे.

श्री.राजु शिंदे :आरक्षण वगळावे लागणार आहे.

श्री.पाटील (न.र.अ.) :मा.सर्वसाधारण सभेच्या निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येईल. रेकॉडला बंधपत्र नाही.

श्री.राजु शिंदे :रेकॉर्डला नसल्यामुळे, बंधपत्र नसल्यामुळे आता काय करणार आहे.

श्री.पाटील (न.र.अ.) :बऱ्याच प्रकरणामध्ये बंधपत्र घेतलेले नाही. आता करण्यात येईल.

श्री.राजु शिंदे :शासन निर्णयानुसार बंधपत्र करणे आवश्यक आहे. संबंधित विभागाला याबाबत माहिती अधिकारात दोन पत्र दिलेले आहे. आजपर्यंत खुलासा केलेला नाही.

श्री.पाटील (न.र.अ.) :माहिती अधिकारामध्ये माहिती दिलेली आहे.

मा.महापौर :शासनाचे परिपत्रकाचा विचार केलेला नाही. महानगरपालिकेच्या वतीने संबधीत अधिकारी यांना नेमण्यात येते.

श्री.राजु शिंदे :नानकवाडी हा भाग महानगरपालिका हद्दीमध्ये येतो का? खुलासा करण्यात यावा. डिपी प्लॅनमध्ये नानकवाडी हा भाग मनपामध्ये दर्शविण्यात आला आहे. नानकवाडी महानगरपालिकेच्या हद्दीमण्ध्ये आली कशी?

श्री.पाटील (न.र.अ.) :नानकवाडी हा गट क्रमांक चुकून टाकण्यात आलेला आहे.

सहा.संचालक न.र. :नानकवाडी बाबत पुन्हा एकदा तपासणी करून कार्यवाही करण्यात येईल.

श्रीमती संगिता वाघुले :चुकून नाही. त्या ठिकाणी खेळाचे मैदान आहे.

श्री.पाटील (न.र.अ.) :Declaired Slum (घोषित झोपडपट्टी) वर आरक्षण टाकता येत नाही. आरक्षण पडले असेल तर दुरूस्ती करण्यात येईल.

श्री.वानखेडे राजगौरव :अनेक तक्रारी हया विकास आरखडया संदर्भात आहे. ज्या अधिकाऱ्यांनी हा तयार केला आहे त्यांची चौकशी करण्यात यावी. तसेच खाम नदी ही हया नकाशामध्ये वळविण्यात आलेली आहे. ले-आऊट झालेले आहे त्यावर आरक्षण टाकलेले आहे याची दखल घेण्यात यावी. गट नं 19 हिमायत नगर जमीन ही येलो करण्यात आली. नदीपात्र हे वळविण्यात आलेले आहेत. यामध्ये फार मोठा गैरव्यवहार झालेला आहे याची चौकशी होणे आवश्यक आहे.

नगररचना अधिकारी(श्री.पाटील):पुर्वीचे नदीचे पात्र आणि आताचे नदीचे पात्र यामध्ये फार मोठी तफावत दिसुन येते.

श्री.राजगौरव वानखेडे :जाणुन बुजून यामध्ये काही लोकांचा फायदा केलेला आहे. यामध्ये खूप मोठा गैर प्रकार झालेला आहे नदि पात्र वळवण्यात/वगळण्यात आलेले आहे.नदी पात्र वळवु शकतो का? नदिपात्राची महसुली नोंद आहे.

मा.महापौर :आपल्या नकाशामध्ये जागा येलो झोन मध्ये दाखविण्यात आलेली आहे.

नगररचना अधिकारी(श्री.पाटील): नाही. तथापी तपासणी करून निर्णय घेण्यात येईल.

श्री.राजु शिंदे :गुगलमॅप ओपन करून बघावे त्यावर घरे स्पष्ट दिसुन येतात. संबधीत अधिकारी यांनी गुगलचा आधार घेणे आवश्यक होते. घरे, स्मशानभुमी व इतर सर्व स्पष्ट दिसले असते. शहर विकास आराखडयाचे काम घरी बसुन करण्यात आलेले आहे. डिप्टीडायरेक्टर यांनी केलेले आहे. त्यांची चौकशी लावली पाहिजे.

मा.महापौर : राज्य शासनाला या संदर्भांत पत्र दिलेले आहे की, मा.सर्वसाधारण सभेमार्फत कळविण्यात यावे, चुका जाणुन बुजून करण्यात आलेल्या आहेत. संबधीत अधिकारी यांचेवर कारवाई झाली पाहिजे.

श्री.राजगौरव वानखेडे :या संदर्भांत मा.आयुक्त यांनी खुलासा करावा.

मा.आयुक्त :प्रपोझल राज्य शासनाकडे पाठविण्यात येईल.

श्री.राजु शिंदे :कारवाई करता येते का? महानगरपालिका कारवाई करू शकते का?

मा.आयुक्त :यासंदर्भांत प्रस्ताव शासनाकडे पाठविल्यानंतर राज्य शासन सक्षम आहे.

मा.महापौर :एका अधिकाऱ्यामुळे चुका झालेल्या आहे. नदीचे पात्र वळविण्यात आलेले आहे. शासनाच्या परिपत्रकाचा अवलंब करण्यात आलेला नाही. घरी बसुन हा सर्व प्रकार घडलेला आहे. महासभेचा अधिकार असल्याने या चुका निदर्शनास आलेल्या आहेत. अधिकाऱ्यांची जबाबदारी आहे.

श्री.कैलास गायकवाड :प्रशासनाचे अधिकाऱ्यांकडुन खुलासा घेण्यात यावा. 28 जानेवारी 1986वर शासन निर्णय चा खुलासा करण्यात यावा. आरक्षण आराखडा तयार करतांना चुका केल्या असतील तर काय केले जावे?

मा.महापौर :शासन निर्णय वाचुन दाखविण्यात यावे.

नगररचना अधिकारी(श्री.पाटील):28 जानेवारी 1986 चा शासन निर्णयामध्ये विकास आराखडा तयार करतांना काळजीपुर्वक तयार करावे अशी सूचना आहे.

श्री.राजु शिंदे :त्यांनी काळजी स्वत:ची घेतली शहराची काळजी घेतलेली नाही. इथल्या कुठल्यास बाबीची काळजी त्यांनी घेतली नाही.

श्री.कैलास गायकवाड :संबधीत अधिकाऱ्याची चौकशी करून कारवाई करण्यात यावी.

श्री.राजु शिंदे :शासन निर्णयाची प्रत लावुन मा.राज्य सरकारकडे पाठविण्यात यावे. शासन निर्णयाप्रमाणे. झालेल्या कारभाराची आणि कडक कारवाई करण्याची मा.आयुक्तांचे पत्रान्वये शासनाकडे पत्र पाठविण्यात यावे. टाऊन प्लॅनिंगचे डायरेक्टर यांचे प्रतिनिधी सभागृहात उपस्थित आहे. त्यांनीही हया चुका कबुल केलेल्या आहेत. असे त्यामध्ये नमुद करण्यात यावे.

श्री.राजगौरव वानखेडे :खुलासा मा.आयुक्तांनी करावा.

मा.महापौर :शासन जी.आर.प्रमाणे कारवाई करण्याची राज्य शासनाला पत्र देण्यात यावे. या सर्व गोष्टींची गंभिर नोंद घेऊन राज्य शासनाला संबधीत अधिकारी यांचेवर या परिपत्रकान्वये कारवाई करण्याचा प्रस्ताव मंजूर करण्यात येतो.

श्री.नंदकुमार घोडेले :किती दिवसात हे पत्र देणार याबाबत खुलासा करण्यात यावा.

श्री.राजु शिंदे :घरामध्ये बसुन नकाशा बनवला नाही, बीअरबारमध्ये बसुन नकाशा बनवला आहे.

मा.आयुक्त :याबाबत मा.महासभेने घेतलेल्या निर्णयानुसार इतिवृत्त शासन परिपत्रकासह शासनास कळविण्यात येईल.

श्री.नंदकुमार घोडेले :करता येते का?

श्री.राजु शिंदे : तात्काळ पत्र पाठविण्याबाबत कार्यवाही करावी.

श्री.नंदकुमार घोडेले :अक्ष्यम्य चुका आहेत. माफ करण्यासारख्या चुका नाहीत. प्रशासनाने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पुढील सभेमध्ये ठेवण्यात यावा.

मा.महापौर :शासनाला पत्र पाठविण्यात यावे. सर्व गोष्टींचा यामध्ये नमुद करण्यात यावे. सभागृहासमोर अहवाल ठेवण्यात यावा.

श्री.राजु शिंदे :शहराच्या वसाहतीमध्ये 40 टक्के भाग गुंठेवारी भाग आहे. अनाधिकृत वस्त्यांवर जे आरक्षण पडलेले आहे. सर्वसाधारण सभेला निर्णय घेण्याचा अधिकार आहे. त्या अधिकाराचा वापर करून हे सर्व उदा.रस्ते,शाळा व इतर हे आरक्षण हटविण्यात यावे. नागरीकांमधील निर्माण झालेली भिती सभेच्या माध्यमाने मिटली पाहिजे.

श्रीमती शेख समिना :ज्या अधिकाऱ्यावर कारवाई होणार आहे त्यामध्ये एका मुद्याचा समावेश करण्यात यावा. शहर विकास आराखडा प्रकाशित झालेला आहे त्याच्या गोपनियतेचा भंग झालेला आहे.

श्रीमती किर्ती शिंदे :हा संपुर्ण आराखडा चुकीचा आहे. नागरी वस्तीवर आरक्षणे टाकण्यात आली आहे. संपूर्ण आराखडा पूर्ण नवीन करून शाळेच्या मैदानासाठी जागा ठेवण्यात यावे. अशी विनंती आहे.

श्री.एडके विकास :Existing Land, Proposed Land, DCR, या तीन गोष्टींना किती वाव दिला.

नगररचना अधिकारी(श्री.पाटील): या सर्व गोष्टीची पुर्तता झालेली आहे. ॲक्ट प्रमाणे आराखडा तयार कलेला आहे.

श्री.एडके विकास :हेरिटेजचा विचार केलेला नाही. हा प्लॅन ग्राऊंड लेवलवर बनविलेला नाही. मंदिर,मस्जिद, कब्रस्थान, स्मशानभुमी मधीन रस्ता गेला आहे. हेरिटेज मंदिर, मस्जीद चर्च कोणतेही धार्मिक स्थळाचा विचार केलेला नाही.

नगररचना अधिकारी(श्री.पाटील):दिनांक 01.08.2014 रोजी Existing Land प्लॅन हॅन्डओव्हर केलेला आहे. याबाबत तपासणी करावी लागेल.

श्री.एडके विकास :डिपी प्लॅन हा ग्राऊंड लेवलवर बनवलेला नाही.

नगररचना अधिकारी(श्री.पाटील):यापुर्वीचे अधिकारी यांचेकडुन काही चुका प्रथम दर्शनी वाटतात. प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी करून केलेला आहे.

श्री.एडके विकास :असे असते तर हॅरिटेज इमारतींवर आरक्षण टाकलेच नसते.

श्रीमती शेख शमीना :गट नं.26 मधुन जाणारा हा रस्ता गट नं.04 मधुन टाकण्यात आलेला रस्ता आहे. तो रद्द करण्यात यावा. हर्सुल येथील गट नं 173,174 हर्सुल परिसरातील विकास आराखडा रद्द करण्यात यावा. 500 ते 600 गरिब जनता राहत आहे. ते आरक्षण हटविण्यात यावे.कोणत्याही समाजाच्या धार्मिक भावना न दुखवता आराखडा मंजूर करावा. अशी माझी विनंती आहे.

श्री.गजानन बारवाल :या विषयावर सकाळपासूनच चर्चा चालु आहे. शहरातील नागरीकांवर विकास आराखडा तयार करून अन्याय केलेला आहे. नागरीकांना यामुळे त्रास भोगावा

लागला आहे. सर्व स.सदस्यांनी व्यक्त केलेल्या मताद्वारे हा विकास आराखडा चुकीचा झालेला आहे. धार्मिक स्थळावर आरक्षण टाकलेले आहे. रस्ता, गार्डन, शाळा घरांवर आरक्षण टाकलेले आहे. शाळा, हॉस्पीटलसाठी आवश्यक ते आरक्षण ठेवावे, हया आरक्षणामुळे काहींवर अन्याय होणारच आहे. माझी सभागृहाला विनंती आहे की, नागरीकांनी घरे घेतली आहे बांधली आहे ही नागरीकांची चुक आहे का? एअरपोर्ट ॲथॉरिटीचा विचार आरक्षणामध्ये करण्यात आलेली नाही. स्लम भागाचा विचार करण्यात आलेला नाही. नागरीकांवर अन्याय होणार नाही याची काळजी घेण्यात यावी. ही विंनती आहे.

श्रीमती माधुरी देशमुख :जे आरक्षण टाकलेले आहे. त्यात काही प्रकरणे हे न्यायप्रविष्ट आहेत. न्यायप्रविष्ठ दाव्यांवर आरक्षण टाकलेले आहे. उच्च न्यायालयात, जिल्हा न्यायालयामध्ये दावे प्रलंबीत/टाकलेले आहेत ते रद्द करण्यात यावे. नागरीवस्त्यांवर आरक्षण टाकलेले आहे ते रद्द करण्यात यावे. नागरीवस्त्यांवर टाकलेले आरक्षणाबाबतीत संबधीतांचा सत्कार करण्यात यावा. ही अक्ष्यम्य अशी चुक आहे धार्मिक स्थळे, शाळा यावर आरक्षण टाकलेली आहे. ते रद्द करण्यात यावे. इनामी जमीनीवर आरक्षण टाकले आहे. योगा आणि व्यायामशाळासाठी कुठेही जागा ठेवलेल्या नाहीत. ती आरक्षीत ठेवण्यात यावी. संबधीत अधिकारी यांचेवर कडक कारवाई करण्यात यावी. नविन विकास आराखडा तयार करण्यात यावा.

मा.महापौर :हया विकास आराखडयामध्ये ज्या चुका झालेल्या आहेत त्या अपेक्षित आहे का? स.सदस्यांनी अतिशय सुक्ष्म अभ्यास केलेला आहे. नदीचे पात्र व इतर सर्व बाबींवर अभ्यासपुर्वक चर्चा केलेली आहे. हया ज्या गोष्टी आहे त्या अपेक्षित आहे का?

नगररचना अधिकारी(श्री.पाटील):विकास आराखडा बाबतीत कलम 21 ते कलम 31 पर्यंत विकास आराखडा तयार करण्याची ॲक्ट मध्ये आहे. जनरल ॲक्ट आणि परिपत्रका प्रमाणे कारवाई झाली पाहिजे. निश्चितपणे सांगता येणार नाही की, हे चुकलेले आहे.

श्री.मनगटे गजानन :उच्च न्यायालयात असलेल्या संरक्षीत भिंतीच्या बाजूला रस्ता टाकला तसेच पोलीस स्टेशनासाठी जागा आरक्षीत ठेवाव्या. गट क्र.16 मध्ये अर्धा भाग घेतला आहे.

श्रीमती नरोटे कमल :अंबिकानगर, संतोषीमाता नगर ते विमानतळ 20 फुटाचा रस्ता करण्यास आराखडयामध्ये घेतलेला आहे. तो रोड रद्द करण्यात यावे, या आराखडयाची परिस्थिती नाजुक झालेली आहे. गरिब नागरीक त्या ठिकाणी राहतात. श्री. लक्ष्मण डवाळे यांचे घरापर्यंत रामभाऊ चव्हाण यांना ॲटॅक सुध्दा आलेला आहे. त्यांना रूग्णालयात भरती केलेले आहे. सदरील रस्ता हा रद्द करण्यात यावा.

श्री.जगताप भाऊसाहेब :अंबिका नगर वॉर्डात पाच रोड टाकण्यात आले आहे. राजीव गांधीनगर संतोषी माता नगर येथे 50 फुटाचा रस्ता टाकण्यात आला आहे. संतोषीमाता नगर 50 फुट, जय भवानी नगर न्यु एसटी कॉलनी 100 फुटाचा रस्ता दाखवण्यात आला आहे. विठ्ठलनगर येथे 24 फुटाचा रोड कशासाठी दाखवला. औरंगाबाद शहरामध्ये डिपी प्लॅन बनवतांना 11 गावांवर या अगोदरच अन्याय झालेला

आहे. मुकूंदवाडी गावातुन 20 मीटरचा रस्ता टाकलेला आहे.रोडवर आरक्षण टाकलेले आहे. जे आरक्षण रोडवर टाकलेले आहे ते रद्द करण्यात यावे. एअरपोर्ट ॲथॉरिटी येथे आरक्षण टाकलेले आहे.

मा.महापौर :गुंठेवारी वसाहतीमध्ये 15 मीटरचे रोड ठेवलेले आहे हे टेक्निकली योग्य आहे का?

श्री.भगवान घडमोडे :जयभवानी नगर, शिवाजी महारांजाचा पुतळा त्या ठिकाणी रोड दाखवला आहे. त्या ठिकाणी अगोदरच सिडकोचा रोड आहे. 13 वी योजना आहे पुढे एअरपोर्टचे acquisition असल्यामुळे या प्रस्तावित विकास योजनेमध्ये कोणती वस्ती आहे. नविन 50 मीटर, 20 मीटरचा रोड दाखवण्याची गरज काय? त्या ठिकाणी कोणती वस्ती आहे.

श्री.जगताप भाऊसाहेब : विठ्ठल नगर 24 मीटरचा रस्ता आहे. मुकूंदवाडी गावातुन 20 मीटरचा रस्ता टाकलेला आहे. तो कशासाठी टाकण्यात आलेला आहे.

मा.महापौर :गोकुळ स्वीट दुकाना समोरिल रस्ता अर्धवट दाखवलेला आहे. जो रस्ता आहे तो कट केलेला आहे. ज्या ठिकाणी रस्ता नाही त्या ठिकाणी नविन रस्ते टाकुन नागरीकांना त्रास देत आहे. सिडकोच्या रस्त्यामध्ये 11 मीटर चा रस्ता असेल तर कसा करता येईल.

नगररचना अधिकारी(श्री.पाटील): सिडकोच्या रस्त्यामध्ये 11 मीटर चा रस्ता असेल तर तो पुढे करता येईल.

मा.महापौर :नागरीकांना त्रास होत आहे. या चुकीची नोंद घेण्यात यावी.

श्री.जगताप कमलाकर :रेल्वे पटरीच्या दोन्ही साईडने 100 फुटाचा रस्ता कशासाठी टाकलेला आहे.

नगररचना अधिकारी(श्री.पाटील):हा जो भाग आहे तो संपुर्णतः नविन एरिया आहे. त्यामुळे त्या ठिकाणी आरक्षण योग्य प्रमाणात ठेवलेले आहे. रेल्वेला कंट्रोल लाईनच्या हिशोबाने रोड दाखवलेला आहे. दोन्ही साईडला 30, 30 मीटरचा चांगला रस्ता निर्माण होईल/मिळेल.

श्री.जगताप कमलाकर : सर्वे नं. 31 मध्ये 38 मध्ये रस्ता आरक्षण टाकण्यात आलेले आहे.

नगररचना अधिकारी(श्री.पाटील):नविन एरिया आहे. त्यामुळे जास्त टाकण्यात आलेले आहे.

श्री.भगवान घडमोडे :सर्व स.सदस्यांनी डिपी प्लॅन विषयी आपल्या भावना या ठिकाणी व्यक्त केलेल्या आहेत. डिपी प्लॅनद्वारा शहराचा विकास करायचा आहे. शहर चांगले करावयाचे आहे परंतु गरीबांच्या घरावर नांगर फिरवुन काम करायचे नाही. अधिकाऱ्यांनी याचा कुठलाही विचार केलेला नाही. अंबिका नगर, जयभवानी नगर, हनुमान नगर, रामचंद्र नगर, मयुरपार्क्, सैनिक कॉलनी, नवनाथ नगर, मोती नगर, राजीव गांधी नगर अशा अनेक सर्वच शहरामध्ये रहिवासी ठिकाणी आरक्षण टाकलेले आहे. आरक्षण टाकत असतांना कुठलाही विचार करण्यात आलेला नाही. अंबिकानगर, जयभवानी नगर येथील एअरपोर्ट प्राधिकरणामध्ये जमीनी जावुन नागरीकांवर विस्थापनाची वेळ आलेली आहे. पुन्हा आता आरक्षण टाकुन नागरीकांवर अन्याय करत आहे. याचा विचार अधिकाऱ्यांनी केलेला नाही. याचबरोबर विकास आराखडा तयार करत असतांना सार्वजनिक सोई सुविधा देतांना चुकीचे नियोजन केलेले आहे. 50 लाख लोकसंख्येसाठी गार्डन, रूग्णालय, प्लेग्राऊड व इतर बाबींचा कुठलाही विचार केलेला नाही.

ज्या ठिकाणी आरक्षण टाकायचे आहे त्याचा विचार करण्यात आलेला नाही. सार्वजनिक सोई सुविधा करतांना अनेक ठिकाणी सरकारी जमिनी उपलब्ध आहेत. हर्सुल येथील स्मृती वनावर छोटे छोटे गार्डनचे आरक्षण टाकुन ठेवण्यात आलेले आहे. मनपाच्या शासकीय जमिनींचा विचार करण्यात आलेला नाही. त्यामुळे जनतेमध्ये प्रचंड नाराजी झालेली आहे. आरक्षण टाकत असतांना रस्ता किती मीटरचा आहे. किती कोणते आरक्षण पाहिजे याचा विचार केलेला नाही. खुलासा करण्यासाठी नगर रचना श्री.पाटील हे उपस्थित आहे. परंतु ज्यांनी हा आराखडा तयार केला ते आज उपस्थित नाही. श्री.पाटील यांनीही बघतो, सांगतो अशा प्रकारचे उत्तरे दिलेले आहे. आरक्षण बदलावे लागणार आहे. अनेक सोसायटया आहेत त्यांचे निवेदने आलेले आहेत. मुकूंदवाडी, माणिकनगर, गजानन नगर, नारेगांव एरिया, अनेक सोसायटयाबाबत तक्रारी आलेल्या आहेत. धार्मीक स्थळांचा समावेश या ठिक्‍ाणी केलेला आहे. मारोती मंदिरावर आरक्षण टाकण्यात आलेले आहे. साधकबाधक कुठलाही विचार न करता मिटमिटा येथील कब्रस्थानाला येलो केलेले आहे. यामुळे नागरीकांची स्थिती वाईट झालेली आहे. शासनाने जनतेला वेठीस धरण्याचे प्रकार केलेला आहे. मा.महापौरांनी वार्डा वार्डात जावुन जनतेला धीर दिलेला आहे. संबधीत अधिकाऱ्यांना शासनाचा आदेश वाचुन दाखविला आहे. जनतेला वेठीस धरण्याचे काम केलेले आहे. जनतेला न्याय मिळायला पाहिजे. सर्वे नं. 69,25,64,68,27,28,208 अशा अनेक सर्वे नं.वर आरक्षण टाकलेले आहे. विमानतळाचे विस्तारिकरण करण्यात येत आहे. सिडकोचा रोड अस्तित्वात असतांना सुध्दा रोड तयार करण्यात येत आहे. नागरीक अनेक वर्षापासुन त्या ठिकाणी राहत आहे. त्यांचा विचार होणे आवश्यक आहे. चुकीच्या पध्दतीने केलेले आरक्षण वगळण्यात यावे. पोलीस स्टेशन, हॉस्पीटल यांचा विचार केला गेलेला नाही. पर्यावरणाचा समतोल राखले जाईल. 20 बाय 30 मध्ये आरक्षण टाकण्याचा दृत डाव आहे. जमीन नोटरीवर बॉडवर आहे त्या ठिकाणी बांधकाम झालेले आहे. महानगरपालिका त्यावर कारवाई करू शकत नाही. रोडची जमीन मुळ मालकाच्या नावांवर आहे. त्यामुळे जनतेच्या रोषास सामोरे जावे लागेल. जमीन मालकाला हाताशी धरुन हे कारस्थान आहे. त्यांना माहिती आहे की, घरावरील आरक्षण काढणे सोपे नाही. संगणमताने हे सर्व कारस्थान केलेले आहे. कब्रस्थानामध्ये आरक्षण टाकलेले आहे. त्यास येलो केलेले आहे आणि येलो जमीनीला कब्रस्थान केलेले आहे. कशा पध्दतीने आराखडा तयार केला हे समजुन येत नाही. म्हणुन संबधीतावर कारवाई करण्याबाबत शासनास कळविण्यात यावे. त्यामुळे पुर्णपणे हा डिपी प्लॅन रद्द करून नविन डिपी प्लॅन तयार करण्यात यावे. सर्वसामान्यांना दिलासा देण्यात यावा. अशी विनंती करण्यात येते.

श्री.नंदकुमार घोडेले :सभागृहात डीपी प्लॅनवर सविस्तर चर्चा झालेली आहे. सर्वप्रथम प्रारूप नकाशा तयार करतांना ज्या चुका झालेल्या आहेत त्याकडे लक्ष वेधत आहे. अत्यंत गंभीर विषयावर चर्चा सविस्तर सुरु आहे. अनेक रस्त्यांवर आरक्षणे टाकण्यात आली आहेत. संबंधीत अधिकाऱ्यांनी आपला विश्वासघात केला आहे. कुठल्याच

प्रकारचा विचार न करता डीपी प्लॅन तयार केला आहे. नक्षत्रवाडी गट नं.११५ मध्ये Tentetive Layout मंजुर करून घेतलेला आहे. टीडीआरची फाईल मंजुर करून जमीन मालकाची विनंती न करता आरक्षण काढून टाकले आहे. दोन आरक्षण आहेत. तेथील आरक्षण शिफ्ट करता येऊ शकत असतांना तेथील आरक्षण उठविले आहे. पाण्याच्या टाकीचे Reservation साठी जागा तेथे नाही व प्रस्तावित केलेली आरक्षणे ही रहिवाशांमध्ये टाकलेली आहे. वीटखेडा गट क्र.५९ Vegetable Market चे reservation टाकण्यात आलेले आहे. त्या ठिकाणी आज घरे झालेली आहेत. स्थळ पाहणी करून निर्णय घेण्यात यावा. नवीन अधिकाऱ्यांची नियुक्ती करुन स्थळ पाहणी करावी. गट क्र. ८१,८२,८३,३५,३६ व ७ मध्ये २४ फुटाचा रस्ता रद्द केलेला नाही. प्रारुप नकाशात हा रस्ता दाखविण्यात आलेला आहे. ४०० ते ५०० घरे झालेली आहेत. १२७ च्या नोटीशीचा विचार करायला पाहिजे होता. धुत बंगल्याशेजारील रस्ता रद्द केलेला नाही. तो दाखविण्यात आलेला आहे. उच्च न्यायालयाचे आदेशात असा कुठलाच उल्लेख केलेला नाही. गट क्र.११ मधील आरक्षण का काढले? याचे कारण समजले नाही. गट क्र.२७ कांचननगर गट क्र.१,१८९ आरक्षण टाकण्यात आलेले आहे. सहकारी गृह निर्माण सोसायटी आहे. यात लक्ष घालावे. गट क्र. ६२, ८२, ८३, ८४, ८७, ८८ बाबतचा विचार करावा. शासनाचे आदेश आहे. फेरबदल मंजुर झालेला आहे. याचा विचार व्हावा. वराह पालन मिटमिटा भागामध्ये दिसून येत नाही. पुर्वीच्या प्लॅनमध्ये आरक्षण होते. कोंडवाडे आरक्षणात दाखवले नाहीत. शासकीय निवास स्थानासाठी आरक्षणे नाहीत. शासनाच्या पत्राचा आधार, सभागृहाची परवानगी आवश्यक आहे. आरक्षणे रद्द केले जातात. सुलभ शौचालय खास करून महिला यांचा विचार करावा. ज्या अधिकाऱ्यांनी चुका केल्या त्यांचेवर कार्यवाही व्हावी.

श्रीमती ज्योती नाडे :अर्ध्या गावावर आरक्षण पडलेले आहे, एअरपोर्ट ॲथॉरिटीचे आरक्षण पडलेले आहे. शेतीवर आरक्षण पडलेले आहे. हनुमान चौक, मोतीवाला कॉलनीवर आरक्षण पडलेले आहेत. शेतीवर आरक्षण पडलेले आहेत. जुने गावठण आहे. ४०-५० वर्षा पासुनचे भाग आहे. जुन्या भागास आरक्षण टाकता येत नाही. या भागात जुन्या वस्त्या आहेत. सगळे दाखवलेले आरक्षण रद्द करण्यात यावे. गट क्र.२९२,५३५,५०८,३८६ असलेल्या आरक्षणाचा विचार करावा.

नगररचना अधिकारी(श्री.पाटील):जर जागा खुल्या असेल तर आरक्षण टाकता येते. काही ठिकाणी गावठाण जागेवर आरक्षण असतात. परंतु ते रिकामे असेल तर आरक्षण टाकू शकतो.

श्रीमती मनीषा मुंढे :गट नं ३८,२४,६८,३८,६९, वरील रस्त्यासाठी आरक्षण टाकले बाजूला जाण्यास रस्ता आहे हे आरक्षण रद्दद करण्यात यावा. ६८,६९,२५,३७,३८,२१,२२,२६ डि.पी. रोड टाकणे चुकीचे आहे. सर्व रस्ता रद्द करण्यात यावे.

सौ.मिना गायके :वार्ड ९३ मध्ये नागरी वसाहतीवरील आरक्षण रद्द करण्यात यावे ही विनंती.

श्रीमती शोभा बुरांडे :सर्व्हे नं.४६,राजगुरूनगर, शहानुरवाडी भागात नागरी वसाहतीवर आरक्षण टाकले.ते काढावे.

श्रीमती विमल कांबळे :मी दिलेल्या निवेदनाचा विचार व्हावा.

श्रीमती मुल्ला सलिमा बेगम:शहानगर गट नं. ३५,२६,२७, आरक्षण टाकले. ३५ वर्षापासुनची वस्ती आहे. ५०० घरे आहेत. आरक्षण हटविण्यात यावे.

मा. महापौर :लहान लहान गट नं.आहेत. तेथेही आरक्षण दाखवण्यात आलेले आहे. पाटील यांनी खुलासा करावा. यात चुका झालेल्या आहे दुरूस्त करू आपले अधिकार आहे

श्री.आत्माराम पवार :भारतनगर,स्वामी स्मर्थ नगर भागात रोड टाकला रद्य करण्यात यावा. Already ३० फुटाच्या रस्ता आहे.

मा.महापौर :जिथे रिकामी जागा आहे. तेथे रोड शिप्ट करावे लागेल. त्या शिवाय Development प्लॅन होणार नाही. ज्या घरावर रस्ता आरक्षण असेल तर त्याच्या विचार करुन पर्यायी जागा पर्यायी रस्ते सुचवावे लागतील. त्याशिवाय Development होणारच नाही.

श्री.भाऊसाहेब जगताप :कशाच्या आधारे रस्ते टाकले याचा खुलासा व्हावा. मुकूंदवाडी येथे जवळपास ३० रस्ते आहे. एकीकडे रेल्वेपटरी आहेत. तरी काही भाग आरक्षणात घेतले

मा.महापौर :राजनगर परिसरात आम्ही सर्व पदाधिकारी गेलो होतो. याबाबत आपण सविस्तर चर्चा करु.तेथे वसाहत झालेली आहे.

श्री.मनोज गांगवे :माझ्या वॉर्डातील काही भाग Airport Authority अंतर्गत येतो.जो आराखडा झाला त्या अगोदर पासून Airport Authority मुळे सर्व नागरीक भयभीत आहे. या आकाराखडा तयार करतांना Airport Authority कडुन बंधनपत्र घेणे आवश्यक होते. लोक विचारत होते की हा वार्डा एअर पोर्ट मध्ये जाणार का एअर पोर्ट ऑथरटीने ही जागा घेतली बातम्या येत होत्या त्यावर आम्ही पत्र दिले.आता या आराखडयानुसार किती भाग जाणार आहे या वस्तीतील लोकांना पर्यायी जागा घेऊ शकत नाही तेथे बांधकाम करू शकत नाही स्लम भाग आहे ८५० लोकवस्ती असलेल्या लोकांनी जायचे कुठे तनवाणी प्लॉटींग आहे पंचमुखी मारोतीचे जागृत मंदीर आहे. Airport plot घेणार असेल तर Airport Authority त्यांना पैसे देणार का? Airport Authority ने जसा plan दिला तसाच्या तसा अधिकाऱ्यांनी आराखड्यात दाखवला.ते आरक्षण काढावे अशी मागणी आहे अधिकाऱ्यांनी कुठलीही शहानिशा केलेली नाही.

श्री.राजु शिंदे :Airport Authority कडुन बंधनपत्र घेतलेले नाही.जेथे घरे झाली ते आरक्षण केले. त्या लोकांना काय न्याय देणार एअरपोर्ट ऑथरीटीला विचारणा केली का?

श्री.मनोज गांगवे :त्या ठिकाणी ८०० घरे झालेली आहे. बंधपत्र मागितलेले नाही. मोबदला संबंधीत व्यक्तींना मिळणार आहे का?

श्री.भगवान घेडमोडे :सदस्याचें म्हणणे असे की तेथे २०X३० प्लॉटींग झाले ती जागा विमान प्राधीकरणाने घेण्याची कार्यवाही केली. ७/१२ वर नाव मुळ मालकाचे आहे.ही घरे निष्कषीत होणार असेल तर या लोकांना पर्यायी व्यवस्था काय व मोबदला देणार की नाही. हा त्यांचा प्रश्न आहे.

नगररचना अधिकारी(श्री.पाटील):ती लॅण्ड ट्रस्टची असेल तरी आरक्षण ठेवु शकतो

श्रीमती सलीमा कुरेशी : माझ्या वार्डात जुने मंदिर आहे. हिना नगर गट नं.२७८ वस्ती आहे. या वरील आरक्षण हटवावे. सादात नगर येथे रस्ता नाही. त्या ठिकाणी रस्त्याचे आरक्षण ठेवण्यात यावे.

श्री.राजु शिंदे :एकाच गट नंबर असलेले शेतात ४-५ आरक्षणे टाकण्यात आले एखादयाच्या नावाने कमी क्षेत्र असेल तर तेथील आरक्षण इतर ठिकाणी टाकले जावे तो व्यक्ती पुर्णपणे भुमिहिन होऊ नये.

श्री.अब्दुल म.नाविद :वॉर्ड नं.१०५ सादातनगर १०,००० वस्ती आहे. राहूलनगर ते सादातनगर मध्ये रस्ता नाही येथे ९ मीटरचा रस्ता करावा. ५५ का रोड कराया जाये. ३५,३६,३७ येथे ५०% रस्ता आला आहे.

श्री.विकास जैन :सर्वाचे अभिनंदन करतो. आपण सर्वजण पुर्ण अभ्यास करुन आलो आहोत. डि.पी.प्लॅन करतांना शासनाचे काही निर्देश आहेत. येणाऱ्या २० वर्षात सर्वांनाच या डि.पी.प्लॅनच्या उपयोग झाला पाहिजे. ज्या नागरिकांना माहित नाही अशा लोकांना या सभागृहा मार्फत न्याय मिळेल. सर्व नगरसेवकांनी बारीक अभ्यास केला आहे. चांगला डि.पी. येणार आहे. मी सर्व पदाधिकारी महापौर यांचे अभिनंदन करतो.

श्री.कैलास गायकवाड :हनुमानगर पाणी टाकीपासुन भारत नगर गट क्र.२१,४७,४८,५० याचा प्रस्तावित रस्ता गेला आहे. गोकुळ स्वीट होम ते अहिल्याबाई चौक रस्ता या रस्त्यावर प्रस्तावित करावा या रस्त्याला समांतर असलला रस्ता (सिडको) तो मोकळा करण्यात यावा. पहाडसिंगपुरा गट क्र.-९८ मध्ये स्मशान भुमी असतांना त्यास येलो केलेला आहे. मोतीनगर परिसरातील गट क्र.४१ येथे पाण्याच्या टाकीचे आरक्षण टाकण्यात आले सर्व जागेवर आरक्षण टाकण्यात आले अशा व्यक्तीचे एखादे तरी आरक्षण हटविण्यात यावे. पुर्वीच्या आरक्षणावर मोबदला दिला त्याचा कुठेही डिपी प्लॅन मध्ये उल्लेख नाही.

श्री.राजेंद्र जंजाळ : १९९२ च्या डि.पी. मधील आरक्षण वगळले.त्यांचे कारण काय ?
काही ठिकाणी १२७ ची कार्यवाही पूर्ण झालेली नाही.तरी १२७ ची कार्यवाही झाली म्हणून आरक्षण वगळले त्याची कारण काय? काही ठिकाणी प्ले ग्राऊंड व शाळेचे आरक्षण असतांना ते कमी केले कारण काय? डीपी रिपोर्ट तयार करतांना सन १९९२ चे आरक्षण काढलेले आहे का?

नगररचना अधिकारी(श्री.पाटील) रिपोर्ट मध्ये सर्व सविस्तर माहिती दिलेली आहे. त्यातील एक भाग आहे.

